28 JUN 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाने पंचगंगा संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा

## जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे आवाहन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाने जलसमृद्ध होण्याच्या दिशेने केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. यापुढील काळात जलसंवर्धनाच्या अनुषंगाने पंचगंगा नदीचे संवर्धन व संरक्षण या दृष्टीने सार्वजनिक पातळीवर जनजागृतीसाठी विद्यापीठाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन ज्येष्ठ जलतज्ज्ञ डॉ.राजेंद्रसिंह राणा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाला त्यांनी सोमवारी सदिच्छा भेट दिली. यावेळी कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के यांच्यासह मान्यवरांसमवेत झालेल्या बैठकीस संबोधित करताना ते बोलत होते. डॉ. राणा म्हणाले, २००४-०५ मध्ये शिवाजी विद्यापीठास भेट दिल्यावर पाण्याच्या बाबतीत चिंतेत होतो. त्यावेळी विद्यापीठास केलेल्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करून जलसमृद्ध पाण्याच्या बाबतीत स्वावलंबी बनलेले विद्यापीठ पाहताना आनंद वाटला. यावरून विद्यापीठाचे पर्यावरणविषयक सकारात्मक धोरण समजून येते. जलसंवर्धन विषयक विविध अभ्यासक्रमांना सुरुवात करता येऊ शकेल.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेटीप्रसंगी जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी. (छाया : पप्पू अत्तार)

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाच्या जलसंवर्धनाचा लाभ जल स्वयंपूर्णतेसाठी तर झालाच; पण त्याचबरोबर गेल्या दोन-तीन वर्षांत कोल्हापूर शहराला महापूर काळात पिण्याच्या पाण्याचा अखंड पुरवठा विद्यापीठामार्फत करता आला. विद्यापीठाने परिसरातील हिरवाई वाढविण्याच्या दृष्टीने , वृक्षारोपण, मियावाकी जंगल वृद्धी असे उपक्रम हाती घेतले आहेत.

याप्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी जलसंवर्धनाच्या अनुषंगाने सादरीकरण केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस.पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. आसावरी जाधव, डॉ. सचिन पन्हाळकर, उदय गायकवाड आदी उपस्थित होते.

### 'नदी की पाठशाला' सारखे उपक्रम राबवा

नदी हाच सर्व प्रकारच्या संस्कृतींचा उगम आणि प्रवाह आहे. या प्रवाहाशी तरुण पिढीला जोडण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. त्या दृष्टीने नदी आणि पाणी सवर्धनाच्या अनुषंगाने 'नदी की पाठशाला' सारखा उपक्रम शिवाजी विद्यापीठाने हाती घ्यावा, असे डॉ. राणा म्हणाले.

2 8 JUN 2022

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# विद्यापीठाचे जलसंवर्धनाचे काम कौतुकास्पद

## जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा; शिवाजी विद्यापीठास भेट

**कोल्हापूर, ता. २७ :** शिवाजी विद्यापीठाने जलसमृद्ध होण्याच्या दिशेने केलेले काम कौतुकास्पद असून, जलसंवर्धनाच्या अनुषंगाने जनजागृती करावी, असे आवाहन ज्येष्ठ जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी आज येथे केले. डॉ. राणा यांनी आज शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह मान्यवरांसमवेत झालेल्या बैठकीत ते बोलत होते.



**कोल्हापूर : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी राजेंद्रसिंह यांना शाहू चरित्र भेट देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी डॉ. पी. डी. राऊत, पी.एस.पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रकाश पाटील, डॉ. आर. के. कामत आदी.**

डॉ. राणा म्हणाले, ''२००४-५ मध्ये मी शिवाजी विद्यापीठास भेट दिली असताना पाण्याबाबत ते चिंतेत होते. त्यावेळी विद्यापीठास केलेल्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करून जलसमृद्ध आणि पाण्याबाबत स्वावलंबी बनलेले विद्यापीठ पाहताना अतिशय आनंद वाटला. यापुढील काळात विद्यापीठाने पंचगंगा नदीचे संवर्धन व संरक्षण या दृष्टीने जनजागृती करण्याची गरज आहे. नदी हाच सर्व प्रकारच्या संस्कृतींचा उगम आणि प्रवाह आहे. या प्रवाहाशी तरुण पिढीला जोडण्यासाठी 'नदी की पाठशाला' सारखा उपक्रम हाती घ्यावा.''

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''विद्यापीठाच्या जलसंवर्धनाचा लाभ जल स्वयंपूर्णतेसाठी तर झालाच; पण, त्याचबरोबर गेल्या दोन-तीन वर्षांत कोल्हापूर शहराला महापूर काळात पिण्याच्या पाण्याचा अखंड पुरवठा विद्यापीठामार्फत करता आला. विद्यापीठाने आता परिसरातील हिरवाई वाढविण्याच्या दृष्टीनेही वृक्षारोपण, मियावाकी जंगल वृद्धी असे उपक्रमही हाती घेतलेले आहेत.''

प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी जलसंवर्धनाच्या अनुषंगाने सादरीकरण केले. बैठकीस प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्यचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. आसावरी जाधव, डॉ. सचिन पन्हाळकर, उदय गायकवाड यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

# दक्षिण कोरियाच्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठात संशोधन

## नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीत तीन विद्यार्थ्यांचा समावेश : स्टुडंट एक्सचेंज प्रोग्रॅमच्या माध्यमातून प्रवेश

प्रतिनिधी
कोल्हापूर

ब्रेन कोरीया-२०२२ या शिष्यवृत्ती उपक्रमाच्या माध्यमातून जेजू नॅशनल युनिव्हर्सिटी, दक्षिण कोरिया येथील तीन विद्यार्थी शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी या अधिविभागात संशोधन करण्यासाठी आले आहेत.

संशोधन शिक्षण घेत असणाऱ्या महेश चौगुले, स्वप्नील पाटील या भारतीय विद्यार्थ्यांसोबतच जुंगमिन किम या दक्षिण कोरियाच्या संशोधक विद्यार्थ्यांचा समावेश आहे. हे विद्यार्थी



स्टुडंट एक्सचेंज प्रोग्रॅमच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठात शिकण्यासाठी आले आहेत.

शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी मधील डॉ. तुकाराम डोंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करणार आहेत. त्यांच्या संशोधनाचं काम सिग्नल प्रोसेसिंग अँड मशीन लर्निंग, या विषयाचे शिक्षण घेत आहेत. तसेच इंटरनेट ऑफ थिंग्स हे असून सदरच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च 'गव्हर्मेंट ऑफ साऊथ कोरिया" करीत आहे. या स्टुडंट एक्सचेंज प्रोग्राममुळे शिवाजी विद्यापीठाचे नाव पुन्हा एकदा जागतिक स्तरावर गेले आहे. या उपक्रमासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत तसेच विद्यापीठाच्या इंटरनॅशनल स्टुडंट सेलचे समन्वयक डॉ. ए. व्ही. घुले यांचे सहकार्य लाभले.



कोल्हापूर : स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीमध्ये शिकत असलेल्या दक्षिण कोरियातील संशोधक विद्यार्थ्यांचे पुस्तक देवून अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. व्ही. घुले, डॉ. अलोक जत्राटकर आदी.

28 JUN 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिव्यांगांच्या प्रगतीची जबाबदारी समाजाचीच

## चिकित्सा मानसशास्त्रज्ञ डॉ. अरुंधती खाडिलकर : कुलगुरु डॉ. शिर्केंच्या हस्ते हेलन केलर स्मृती पुरस्काराने सन्मान

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

बौद्धिक अक्षम (मतिमंद) व गतीमंद (स्लो लर्नर) असो अथवा कोणत्याही प्रकारचे शारीरिक, मानसिक व्यंगत्व असलेल्या व्यक्तींना दुजाभावाची वागणूक न देता रोजगार, प्रशिक्षण व शिक्षण देऊन विकासाच्या वाटेवर आणण्याची जबाबदारी समाजाची आहे. ही जबाबदारी समाजाने सार्थपणे पेलावी, असे आवाहन पुण्यातील चिकित्सा मानसशास्त्रज्ञ डॉ. अरुधंती खाडिलकर (मुळगाव सांगली) यांनी सोमवारी येथे केले.

चेतना विकास मंदिरच्या वतीने हेलन केलर स्मृती पुरस्कार वितरण समारंभात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी चेतना विकास मंदिरचे अध्यक्ष नरेंद्र बगरे होते. हेलन केलर यांच्या जन्मदिनाचे औचित्य



**कोल्हापूर : चेतना विकास मंदिरच्या वतीने दिला जाणारा हेलन केलर स्मृती पुरस्कार कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना चिकित्सा मानसशास्त्रज्ञ डॉ. अरुधंती खाडिलकर. सोबत अजया पाटील, नरेंद्र बगरे, डॉ. सुनील पाटील, पवन खेबुडकर व दिलीप बापट आदी.**

साधून शेंडा पार्कमधील चेतना मंदिरमध्ये या समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते डॉ. खाडिलकर यांना हेलन केलर स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मानपत्र, मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे. चेतनाचे सचिव दिलीप बापट यांनी मानपत्राचे वाटप केले.

दरम्यान, कार्यक्रमाच्या डॉ. खाडिलकर यांच्या हस्ते हेलन केलर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यानंतर प्रारंभी डॉ. सुनील पाटील यांनी खाडिलकर यांची ओळख करुन दिली. ते म्हणाले, खाडिलकर ह्या अवघ्या चार महिन्याच्या असताना, त्यांना पोलिओ झाला. यात त्यांचा दोन्ही पायासह एक हात अधू झाला. पण जगण्याची जिद्द न हरता खाडिलकर यांनी शिक्षण पूर्ण केलेच. शिवाय चिकित्सा मानसशास्त्रज्ञ म्हणूनही समाजासोबत स्वत:ची ओळख निर्माण केली. गेल्या अनेक वर्षांपासून त्या समाजसेवी संस्थांसाठी मनोचिकित्सक व समुदेशक म्हणून सेवा देत आहेत.

डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. खाडिलकर यांनी शिवाजी विद्यापीठात दिव्यांगांना निरनिराळ्या सुविधा देणारे केंद्र सुरु करण्याचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देत विद्यापीठाने दिव्यांगांना सुविधा देणाऱ्या केंद्राची स्थापना केली आहे. आता भविष्याची गरज म्हणून चेतना विकास संस्थेशी सामंजस्य करार करुन दिव्यांग लोक धडधाकट व्यक्तींप्रमाणे प्रगतीच्या प्रवाहात येतील, असे विविध उपक्रम राबवण्यासाठी विद्यापीठाकडून सकारात्मक पाऊले उचलली जातील, असे डॉ. शिर्के यांनी सांगितले. चेतनाच्या एका विद्यार्थीनीने हेलर केलर व त्यांनी जीवनात केलेल्या संघर्षाची माहिती सांगितली. चेतना विकास मंदिरचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य पवन खेबुडकर यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी ज्येष्ठ अभिनेते डॉ. शरद भुताडिया, डॉ. भरत ठकार, मुख्याध्यापक अजया पाटील, श्रीराम भिसे, दया बगरे, ज्येष्ठ पत्रकार उदय कुलकर्णी व सुनील करकरे आदी उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठाच्या सर्व परीक्षा 'ऑफलाइन एमसीक्यू'

## विद्यार्थ्यांच्या लढ्याला यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाकडून उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व ६५८ परीक्षा ऑफलाइन एमसीक्यू (वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नावली) स्वरूपात होणार आहेत. विद्या परिषद या अधिकार मंडळाने मान्यता दिल्यानंतर सोमवारी विद्यापीठाने त्याबाबतचा निर्णय घेतला. त्यामुळे गेल्या दोन महिन्यांपासून विद्यार्थ्यांच्या सुरू असलेल्या लढ्याला यश मिळाले आहे.

विद्यापीठाने उन्हाळी सत्रातील सर्व परीक्षा ऑफलाइन एमसीक्यू स्वरूपात घेण्यासाठी गेल्या दोन महिन्यांपासून विद्यार्थ्यांनी आंदोलनाच्या माध्यमातून लढा दिला. गेल्या आठवड्यापासून त्यांनी लढ्याची तीव्रता (पान १० वर)

### परीक्षेचे स्वरूप असे

सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने (प्रत्यक्ष परीक्षा केंद्रावर हजर राहून) ५० गुणांची संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित (प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण २५ प्रश्न प्रत्येकी २ गुण) परीक्षा एक तास कालावधीची एमसीक्यू पद्धतीने होणार आहे. त्यासाठी प्रश्नसंचिका, जादा वेळ, दोन पेपरमधील अंतर आदींची मुभा असणार नाही.

जनसंपर्क कक्ष
2 8 JUN 2022 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर

# विद्यापीठाच्या सर्व परीक्षा 'ऑफलाइन एमसीक्यू'

(पान १ वरून) वाढविली. त्यावर विद्यापीठाने गुरुवारी सायंकाळी अभियांत्रिकी, विधि अभ्यासक्रमांची परीक्षा ऑफलाइन एमसीक्यू आणि उर्वरित सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा पूर्वीप्रमाणे ऑफलाइन वर्णनात्मक घेण्याचा निर्णय जाहीर केला; पण विद्यार्थी संघटना सर्व परीक्षा ऑफलाइन एमसीक्यू स्वरूपात घेण्याच्या मागणीवर ठाम राहिल्या. त्यावर विद्यार्थ्यांची मागणी विद्यापीठ प्रशासनाने सोमवारी विद्या परिषदेसमोर ठेवली. या अधिकार मंडळाने उन्हाळी सत्रातील सर्व परीक्षा ऑफलाइन एमसीक्यू स्वरूपात घेण्यास मान्यता दिली. त्यानुसार

विद्या परिषद या अधिकार मंडळाने दिलेल्या निर्णयानुसार यावर्षी उन्हाळी सत्रातील सर्व परीक्षा ऑफलाइन एमसीक्यू स्वरुपात घेण्यात येणार आहे. त्याचे सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाईल. **-डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

परीक्षा होतील. नव्या पद्धतीनुसार परीक्षेची तयारी करण्यास विद्यापीठाला काही कालावधी लागणार आहे. त्याचा विचार करून सुधारित वेळापत्रक परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून लवकरच जाहीर केले जाणार आहे. महाविद्यालय स्तरावर सुरू असलेल्या पदवी प्रथम वर्ष पारंपरिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाविद्यालयाच्या नियोजनानुसार सुरू राहणार आहेत.

## आकडेवारी दृष्टिक्षेपात

उन्हाळी सत्रात होणाऱ्या परीक्षा : ६५८

परीक्षार्थींची संख्या : २ लाख

### अशी होती विद्यार्थ्यांची मागणी

विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये यासाठी परीक्षा पद्धतीमध्ये एकसमानता असावी. त्यामुळे अभियांत्रिकी, विधि अभ्यासक्रमांप्रमाणे सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाइन एमसीक्यू पद्धतीने घेणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने विद्यापीठाने निर्णय घ्यावा, अशी मागणी सर्व विद्यार्थी संघटना कृती समितीने केली होती.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा ऑफलाईन पद्धतीने होणार

## विद्या परिषदेच्या बैठकीत निर्णय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थी आणि संघटनांच्या आंदोलनानंतर अखेर शिवाजी विद्यापीठाने सर्व परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पद्धतीने घेण्याचा निर्णय विद्या परिषदेच्या सोमवारी झालेल्या बैठकीत घेतला.

कोरोनानंतर राज्यातील सर्वच विद्यापीठ परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. परंतु, विद्यापीठाने ऑफलाईन लेखी वर्णनात्मक परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. याच्याविरोधात विद्यार्थी व संघटनांनी आंदोलन केले. काहींनी न्यायालयात याचिका दाखल केली. त्यामुळे लॉ व अभियांत्रिकी विभागाच्या परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पद्धतीने घेण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने जाहीर केला. त्यानंतर विद्यापीठातील इतर अभ्यासक्रमांच्या सर्व परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पद्धतीने घ्या, या मागणीसाठी विद्यार्थी रस्त्यावर उतरले होते. त्यामुळे विद्यापीठाने सर्व परीक्षा स्थगित केल्या.

दरम्यान, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी विद्या परिषदेची बैठक झाली.

■ ऑफलाईन एमसीक्यू परीक्षा ऑफलाईन पद्धतीने (प्रत्यक्ष परीक्षा केंद्रावर हजर राहून) ५० गुणांची संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित (प्रश्नपत्रिकेमध्ये २५ प्रश्न प्रत्येकी २ गुण), परीक्षेचा वेळ एक तासाचा असेल. बहुपर्यायी प्रश्नावली (एमसीक्यू) पद्धतीने घेण्यात येणार आहे. यासंदर्भात वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या शासन निर्देशांनुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. पदवी व पदव्युत्तर स्तरावरील परीक्षेचे सुधारित वेळापत्रक लवकरच विद्यापीठ जाहीर करणार आहे.

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पद्धतीने

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाकडून उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सर्व परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू स्वरूपात होणार आहेत. विद्यार्थी संघटनांच्या मागणीनुसार विद्या परिषदेने त्यास मान्यता दिली आहे. त्यानंतर सोमवारी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने त्याबाबतचा निर्णय घेतला आहे. अन्य विद्यापीठांप्रमाणे शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षाही ऑफलाईन एमसीक्यू पद्धतीने घेण्यात याव्ययात, अशी मागणी विविध विद्यार्थी संघटनांनी केली होती. याबाबत विद्यापीठ प्रशासनातर्फे विद्यार्थ्यांची मागणी सोमवारी विद्या परिषद या अधिकार मंडळासमोर ठेवली. त्यामध्ये सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पद्धतीने घेण्यास मान्यता मिळाली.

2 8 JUN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्वच परीक्षा बहुपर्यायी पद्धतीने

## विद्यार्थी परिषदेच्या बैठकीत निर्णय; अटी, वेळापत्रक लवकरच जाहीर

**सकाळ वृत्तसेवा**

**कोल्हापूर, ता. २७ :** विद्यार्थ्यांच्या मागणीवरून शिवाजी विद्यापीठाच्या सर्व परीक्षा यंदा ऑफलाईन आणि बहुपर्यायी (एमसीक्यू) स्वरुपाची प्रश्नपत्रिका देऊन घेतल्या जाणार आहेत. आज झालेल्या विद्यार्थी परिषदेच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना काही अटी घालण्यात आल्या आहेत. परीक्षा तोंडावर असतानाच हा निर्णय घेतला गेल्याने परीक्षांच्या वेळापत्रकात बदल होईल. नवे वेळापत्रक लवकरच जाहीर होईल, अशी माहिती विद्यापीठातील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दिली.

कोरोनामुळे महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रमाचा बराचसा भाग हा ऑनलाईन पद्धतीने शिकवला गेला. एस.टी. संपामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयात जाता आले नाही. राज्यातील अन्य विद्यापीठे बहुपर्यायी प्रश्नपत्रिका देऊन परीक्षा घेणार आहेत. त्यामुळे विद्यापीठाचे विद्यार्थी मागे पडतील. अशी कारणे देत विविध विद्यार्थी संघटनांनी परीक्षा ऑफलाईन पण बहुपर्यायी (एमसीक्यू) पद्धतीने घ्यावी, यासाठी आंदोलन केले



होते. काही संघटनांनी विद्यापीठाच्या प्रवेशद्वारासमोर साखळी उपोषण केले. या सर्व पार्श्वभूमीवर आज विद्यार्थी मंडळाची बैठक झाली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. यावेळी विद्यार्थ्यांची मागणी मान्य करून विद्यापीठाच्या सर्वच परीक्षा ऑफलाईन; पण बहुपर्यायी स्वरूपाची प्रश्नपत्रिका देऊन घेतल्या जाणार आहेत. त्यामुळे आता परीक्षा विभागाला नव्या प्रश्नपत्रिका काढाव्या लागणार आहेत.

ओएमआर शिटदेखील बनवाव्या लागतील. या तयारीसाठी वेळ लागणार असून त्यामुळे परीक्षा एक महिना पुढे जाण्याची शक्यता आहे. मात्र, विद्यार्थ्यांची मागणी मान्य झाल्याने त्यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### शैक्षणिक क्षेत्रात चर्चेला उधाण

विद्यापीठाने घेतलेला निर्णय योग्य की अयोग्य या विषयावर शैक्षणिक वर्तुळात बरीच चर्चा सुरू आहे. काहींच्या मते विद्यापीठाचा निर्णय चुकीचा आहे तर काहींच्या मते हा निर्णय योग्य आहे. काही जणांच्या मते हा विद्यापीठाच्या स्वायत्ततेमध्ये केलेला हस्तक्षेप आहे.

### ...अशी असेल परीक्षा

संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित ५० गुणांची परीक्षा असेल. प्रत्येक दोन गुण असणारे २५ प्रश्न विचारले जातील. एका तासात ही प्रश्न पत्रिका सोडवायची असून त्यासाठी कोणताही जादा वेळ मिळणार नाही.

### संभाव्य प्रश्नांची यादी नाही

विद्यार्थ्यांना संभाव्य प्रश्नाची यादी देण्यात येणार नाही. अभ्यासक्रमावर आधारित प्रश्न काढले जातील. त्यानुसार परीक्षा घेतली जाणार आहे.

28 JUN 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पध्दतीने

## शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेच्या बैठकीत निर्णय : विद्यार्थ्यांकडून स्वागत

### ऑफलाईन एमसीक्यू परीक्षेसाठी अटी

विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तर स्तरावरील परीक्षा ऑफलाईन पध्दतीने (प्रत्यक्ष परीक्षा केंद्रावर हजर राहून) ५० गुणांची संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित (प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण २५ प्रश्न प्रत्येकी २ गुण) असणार आहे. परीक्षेचा वेळ एक तासाचा असून बहुपर्यायी प्रश्नावली (एमसीक्यू) पध्दतीने घेण्यात येणार आहे. यासंदर्भात वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या शासन निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी. पदवी व पदव्युत्तर स्तरावरील परीक्षेचे सविस्तर सुधारित वेळापत्रक यथावकाश जाहीर करण्यात येत आहे. या अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी प्रश्नसंचिक, ज्यादाची वेळ, दोन पेपरमध्ये अंतर इत्यादी बाबींची मुभा असणार नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील सर्व परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पध्दतीने घेण्याचा निर्णय सोमवारी शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. ही बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. विद्यापीठाच्या या निर्णयाचे कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी स्वागत केले आहे. असे असले तरी परीक्षेची तयारी करण्यात वेळ



जाणार असल्याने जवळपास एक महिना परीक्षा पुढे जावू शकतात, अशी चर्चा शिक्षण वर्तुळात आहे.

कोरोनानंतर राज्यातील सर्वच विद्यापीठ परीक्षा ऑफलाईन पध्दतीने घेण्याचा निर्णय राज्य सरकारने कुलगुरूंशी चर्चा करून घेतला होता. परंतू या निर्णयाला सुरूवातीला लॉ अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी विरोध केला. एकीकडे लॉचे विद्यार्थी चक्क रस्त्यावर उतरले तर दुसरीकडे न्यायालयात याचिका दाखल केली. विद्यापीठ अधिविभाग, महाविद्यालयातील २ हजारपेक्षा जास्त विद्यार्थी रस्त्यावर उतरले होते. त्यामुळे लॉ आणि अभियांत्रिकी विभागाच्या परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पध्दतीने घेण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने जाहीर केला. त्यानंतर शुक्रवारी विद्यापीठातील इतर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनीही सर्व विषयाच्या परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पध्दतीने घ्या, या मागणीसाठी आंदोलन केले. त्यामुळे विद्यापीठाने सर्व परीक्षा स्थगित केल्या.

सोमवारी विद्या परिषदेच्या बैठकीत चर्चा करून सर्व विषयाच्या परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पध्दतीने घेण्याचा निर्णय घेतला. विद्यापीठाच्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे, असे असले तरी परीक्षा जवळपास एक महिना पुढे जातील हे निश्चित आहे. या वेळेत तरी विद्यार्थ्यांनी आपली अपूर्ण प्रॅक्टीकल, जर्नल पूर्ण करावीत, अशी चर्चा शिक्षण क्षेत्रात सुरू आहे. अर्थात परीक्षा ऑफलाईन पद्धतीने होणार असल्यामुळे विद्यार्थ्यांना याचा फायदा होईल अशी आशा आहे.

**प्रश्नपत्रिका, ओएमआर शीट तयार करण्यात वेळ जाणार**

पुन्हा प्रश्नपत्रिका तयार करणे, जवळपास चार लाख ओएमआर शीट तयार करणे यामध्ये एक महिन्याचा कालावधी जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात विद्यापीठ परीक्षा होण्याची शक्यता दर्शवली जात आहे.

तरूण भारत

# 'डेक्कन'मध्ये इंटेरिअर डिझाईनसाठी प्रवेश सुरू

**कोल्हापूर :** इंटेरिअर डिझाईन ह्या क्षेत्राचे परिपूर्ण व्यावसायिक ज्ञान देणाऱ्या कोल्हापुरातील डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीमध्ये विविध प्रकारचे व्यावसायिक कोर्स उपलब्ध असून शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता यादीमध्ये विद्यार्थ्यांचा समावेश आहे. संस्थेत इंटेरिअर डिझाईनची शिवाजी विद्यापीठ मान्यता पदवी व महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळ मान्यता प्राप्त डिप्लोमा अभ्यासक्रम असून मोजक्याच जागा शिल्लक आहेत. सदरच्या कोर्ससोबत संस्थेत महाराष्ट्र राज्य व्यावसायिक शिक्षण मंडळ यांचा रोजगार कौशल्य आधारित अभ्यासक्रम बिल्डिंग साईट सुपरवायझर हा एक वर्ष कालावधीचा व प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त इंटेरिअरस्केप गार्डन डिझाईन आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम व्हॅल्युएशन ऑफ इम्मुव्हेबल प्रॉपर्टी कोर्सेस सुरु आहेत. पदवी, पदविका व सर्टिफिकेट कोर्स पूर्ण झाल्यानंतर स्वतःचा व्यवसाय सुरु करू शकतो. तरी प्रवेशबद्दल अधिक माहितीसाठी डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, ३ रा मजला, कॉसमॉस कॉम्प्लेक्स, न्यु शाहूपुरी कोल्हापूर येथे अथवा ०२३१-२६६६८१४, २६६७८१४ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.